# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

# सामाजिकशास्त्रे अभ्यासमंडळ

## वार्षिक अहवाल

2018-2019

2018-2019 या शैक्षणिक वर्षात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचा पदभार डॉ. आर. व्ही. लोमटे यांच्याकडून प्रा. विजय पांडे यांच्याकडे हस्तांतरित झाला. जून 2018 मध्ये . आर. व्ही. लोमटे यांच्याकडून प्रा. विजय पांडे यांनी फाइल हस्तांतरित केल्या.

## विषय प्रतिनिधी निवड:

दि. 14 सप्टेंबर 2018 रोजी सामाजिक शास्त्रातील विषयानुसार विद्यार्थी प्रतिनिधीची निवड करण्यात आली. ज्यामध्ये प्रा. विजय पांडे, डॉ. आर. व्ही. लोमटे, डॉ. पी. एम. कल्याणकर, डॉ. एम. एम. नळगिरकर यांनी विद्यार्थी प्रतिनिधीची निवड केली.

1. सोमिनाथ सहाने इतिहास
2. निवृत्ती गाडेकर राज्यशास्त्र
3. ज्योति उदे अर्थशास्त्र
4. दीपाली बोलकर समाजशास्त्र

## भित्तिपत्रकाचे प्रकाशन:

17 सप्टेंबर 2018 रोजी हेद्राबाद मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून इतिहास व अर्थशास्त्र विषयाच्या व्याख्या आणि राज्यशास्त्र व समाजशास्त्र विषयाच्या व्याख्या या दोन भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्रा. दिनेश कचकुरे यांच्या हस्ते करण्यात आले.




## सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन:

10 ऑक्टोबर 2018 रोजी प्रा. डॉ. केशव लहाने, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री यांच्या हस्ते सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी सामाजिक शास्त्रांचे महत्व विषद करताना सामाजिक शास्त्रांचा अभ्यास विविध अंगांनी केला जातो, समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सामाजिक शास्त्रे करत असते असे प्रतिपादन केले.

सकाळ



# सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

## फुलंब्री येथील संत सावता माळी महाविद्यालयाचा उपक्रम

**फुलंब्री, ता. १३ (बातमीदार) :** येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन राजर्षी शाहूचे इतिहास विभागप्रमुख प्रा. केशव लहाने यांच्या हस्ते करण्यात आले. यशवंत विद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. गेडाम यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांची उपस्थिती होती. प्रा. विजय पांडे यांनी प्रास्ताविक केले.

या वेळी इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र विभागाचे प्रतिनिधी सोमिनाथ सहाणे, निवृत्ती गाडेकर, ज्योती उदे, दीपाली बोलकर यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. लहाने म्हणाले, की सामाजिकशास्त्राचा अभ्यास विविध अंगांनी केला जातो.

समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सामाजिकशास्त्र करीत असते. समाजातील वास्तव आणि जाणिवा समजून घ्यावयाच्या असतील तर सामाजिकशास्त्राशिवाय पर्याय नाही. सामाजिकशास्त्राची व्याप्ती आज वाढत चालली आहे. म्हणून सामाजिकशास्त्राचा अभ्यास करावयाचा असेल तर समाजकल्याणाचा विचार करायला पाहिजे. विविध समाजघटकांपर्यंत पोचता आले पाहिजे. डॉ. गेडाम म्हणाले, की विद्यार्थ्यांना समाजात माझी काय ओळख आहे याची जाणीव समाजिकशास्त्रांमधून मिळावी, ती मिळते आहे; परंतु ती जाणीव आजच्या विद्यार्थ्यांना व्हावी, ही अपेक्षा व्यक्त केली. यासाठी प्रा. विजय पांडे, प्रा. दिनेश कच्कुरे, प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. मंजूषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव, प्रा. डॉ. रामकिसन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांनी पुढाकार घेतला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. निवृत्ती गाडेकर यांनी आभार मानले.

**फुलंब्री :** संत सावता माळी महाविद्यालयात सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करताना प्रा. केशव लहाने, डॉ. गेडाम, प्राचार्य डॉ. सुभाष टकले.

Aurangabad, District-Today
14/10/2018 Page No. 2

VIJAY PANDE




# देशोन्नती

12.10.2018

## समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सामाजिकशास्त्रात - प्रा. केशव लहाने

### श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन



**तालुका प्रतिनिधी / ११ ऑक्टोबर**

**फुलंब्री :** सामाजिक शास्त्राचा अभ्यास विविध अंगानी केला जातो. समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सामाजिकशास्त्र करत असते असे मत प्रा. केशव लहाने यांनी व्यक्त केले.

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उदघाटन दि.१० रोजी करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती प्रा.डॉ. गेडाम, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना लहाने म्हणाले की, समाजातील वास्तव आणि जाणिवा समजून घ्यावयाच्या असतील तर सामाजिक शास्त्राशिवाय पर्याय नाही. सामाजिक शास्त्राची व्याप्ती आज वाढत गेलेली आहे. म्हणून सामाजिक शास्त्राचा अभ्यास करावयाचा असेल त्याचबरोबर समाजकल्याणाचा विचार करावयाचा असेल तर विविध समाज घटकापर्यंत पोहचता आले पाहिजे. हा विचार व्यक्त केला. तसेच डॉ. गेडाम म्हणाले की, विध्यार्थ्यांना समाजात माझी काय ओळख आहे याची जाणीव समाजीकशास्त्रांमधून मिळावी ती मिळते आहे. परंतु ती जाणीव आजच्या विद्यार्थ्यांना व्हावी ही अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा. विजय पांडे यांनी केले. यावेळी इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र विभागाचे प्रतिनिधी अनुक्रमे सोमीनाथ सहाणे, निवृत्ती गाडेकर, कु. ज्योती उदे, कु. दीपाली बोलकर यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस.आर. टकले यांनी केला. तर उपस्थितांचे आभार निवृत्ती गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. विजय पांडे, प्रा. दिनेश कचकुरे, प्रा.डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा.डॉ. मंजूषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव, प्रा.डॉ. रामकीसन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांनी प्रयत्न केला. सूत्रसंचलन ज्योती उदे हिने केले.

ePaper देशोन्नती Fri, 12 October 2018
deshonnati.digitaledition.in/c/33044040

# दैनिक दिव्य मराठी

11.10.2018

## सामाजिक शास्त्राशिवाय पर्याय नाही : प्रा. लहाने



संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना मान्यवर. छाया : संदीप मोरे

**प्रतिनिधी** | फुलंब्री

समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सामाजिकशास्त्र करत असते. समाजातील वास्तव आणि जाणिवा समजून घ्यावयाच्या असतील तर सामाजिक शास्त्राशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन पाथ्री राजर्षी शाहू महाविद्यालयाचे इतिहास विभागाचे प्रा. केशव लहाने यांनी केले.

या वेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. गेडाम हे होते. तर सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन प्रा. केशव लहाने यांच्या हस्ते झाले. प्रा. लहाने म्हणाले की, सामाजिक शास्त्राचा अभ्यास विविध अंगांनी केला जातो. समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सामाजिकशास्त्र करत असते. समाजातील वास्तव आणि जाणिवा समजून घ्यावयाच्या असतील तर सामाजिक शास्त्राशिवाय पर्याय नाही, असेही ते म्हणाले. याप्रसंगी सोमीनाथ सहाणे, निवृत्ती गाडेकर, ज्योती उदे, दीपाली बोलकर यांचा सत्कार केला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला, तर उपस्थितांचे आभार निवृत्ती गाडेकर यांनी मानले. यशस्वितेसाठी प्रा. विजय पांडे, प्रा. दिनेश कचकुरे, प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. मंजूषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव, डॉ. रामकिसन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांनी प्रयत्न केले.

## विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धा:

2019 हे वर्ष महात्मा गांधी यांच्या जयंतीचे 150 वे असल्याने महाविद्यालयातील सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाने विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धा घेतली. यात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 28 लेख पाठवले. आलेले लेखांचे प्रा. डॉ. गवळीकर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड यांनी परीक्षण केले. या स्पर्धेत विजेते खालीलप्रमाणे

**प्रथम** – व्यवहारे हर्षल अंबादास, जे. ई. एस. महाविद्यालय, जालना

**द्वितीय**- पवार प्रतीक्षा भाऊसाहेब, आसारमजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव

**तृतीय**- 1. गायके शीतल भिकण, आसारमजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव

2. पवार मानसी गुलाबराव, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**उत्तेजनार्थ**- 1. हाडे संगीता दसारथ, कला महाविद्यालय, बीडकिन

2. ढोके स्वप्नील एकनाथ, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## निबंध स्पर्धा बक्षीस वितरण :

20 फेब्रुवारी 2019 रोजी सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. विजय पांडे, डॉ. आर. व्ही. लोमटे, डॉ. पी. एम. कल्याणकर, डॉ. एम. एम. नळगिरकर हे उपस्थित होते.


महापुरुषाची कृती आणि विचार ही राष्ट्राची संपत्ती आहे.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर.
डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री
व
राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री
Save Electricity
20.02.2019